
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा०वा०
दा. क्र. 3380



केशव भिकाजी ढवळे : गिरगांव मुंबई

श्रीसमर्थ-सदन-बाल-प्रकाशन

५६

५१०९२०
३३८५

# मोठीं माणसें

## भाग पहिला

२९५०५
बा वां
१९०६
७-३-६१

लेखक

केशव हरि सहस्रबुद्धे

ठाणे
३३८५

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य सहा आणे

# दोन शब्द

गोष्ट म्हटली कीं कोणास आवडत नाहीं? मुलगा असो, म्हातारा असो. कोणी गोष्टी सांगूं लागला कीं सारेजण ऐकत असतांना दिसतील! साधा वरणभात सगळेच खातात! पण जर का तेंच वरण उत्तम फोडणी देऊन, चांगलें चमचमीत केलें तर तोच वरणभात सारेजण भुरके मारून मिटक्या मारीत खातील! गोष्टींचेंही तसेंच आहे.

अगदीं लहान मुलांना इतिहासांतील स्त्री-पुरुषांच्या गोष्टी सांगतांना त्यांतील रूक्षपणा काढून टाकून, चटकदार भाषेंत वर्णन करून, जर त्या सांगितल्या तरच मुलें त्यांत रंगतील.

सदर पुस्तकांतील गोष्टी त्या दृष्टीनें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रसंगानुरूप चित्रें घातल्यामुळें ती गोष्ट मुलांच्या पक्की ध्यानांत राहाते. सदर पुस्तकांत शक्य तों प्रसंगानुसार चित्रें घातलीं आहेत.

कांहीं कांहीं गोष्टींच्या शेवटीं लहान मुलांच्या काव्यांतच, गोष्टींतील ठळक प्रसंग वर्णिलेला असल्यामुळें, त्याच्या आधारें गोष्ट ध्यानांत ठेवण्यास मदत होईल. असो.

के. ह. सहस्रबुद्धे

सर्वाधिकार प्रकाशकाधीन


प्रथमावृत्ति : १९४०, पुनर्मुद्रण : १९४३, १९५०

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २
प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई ४

२९५०५

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | गौतम बुद्ध | [illegible] |
| २ | रामदेवराव यादव | [illegible] |
| ३ | दामाजीपंत | १२ |
| ४ | पृथ्वीराज चव्हाण | १५ |
| ५ | ज्ञानेश्वर | १९ |
| ६ | बादशाहा बाबर | २४ |
| ७ | बादशाहा अकबर | २७ |
| ८ | चांदबिबी | ३१ |
| ९ | तुकाराम | ३४ |
| १० | श्रीसमर्थ रामदासस्वामी | ३८ |
| ११ | छत्रपति शिवाजीमहाराज | ४१ |
| १२ | राणी लक्ष्मीबाई | ४६ |
| १३ | हैदरअल्ली | ४९ |
| १४ | नाना फडणीस | ५२ |



29505
क्रा. वा.
75456
1-7-51

★ १ ★

# गौतम बुद्ध

आटपाट नगर होतें. त्याचें नांव कपिलवस्तु. तिथें एक राजा राज्य करीत होता. त्याचें नांव शुद्धोदन. त्याला एक मुलगा होता. त्याचें नांव सिद्धार्थ. तो मोठा सुंदर होता. राजाला तो फार आवडे. राणीला तो फार आवडे. सगळ्यांना तो फार आवडे. पुढें तो मोठा झाला. एक राजकन्या होती. तिचें नांव यशोधरा. राजानें सिद्धार्थाचें यशोधरेबरोबर लग्न केलें.



खूप दिवस झाले. सिद्धार्थ एकदा फिरायला गेला होता. जातां जातां त्याला एक म्हातारा भेटला. गरीब बिचारा म्हातारा! काठी टेकीत टेकीत चालला होता. त्याची मान गुडघ्यांत आली होती. त्याला धड चालवत देखील नव्हतें. थोडा पुढें गेल्यावर त्याला एक विचित्रच माणूस भेटला. त्याचीं सारीं बोटें झिजून गेलीं होतीं. त्याचें तोंड वेडेंवाकडें झालें होतें. त्याचें सारें आंग सुजल्यासुजल्यासारखें दिसत होतें. त्याच्याकडे पाहवत देखील नव्हतें. सिद्धार्थाला

कसेंसेंच वाटलें. तो आणखी पुढें गेला. तो त्याला एक प्रेत दिसलें. सारे लोक मागून दुःख करीत चालले होते. सिद्धार्थाला वाईट वाटलें. तो विचार करीत उभा राहिला. काय करावें हें त्याला सुचेना. इतक्यांत तेथें एक साधु आला.

सिद्धार्थानें साधूला नमस्कार केला. "सारे लोक दुःख करितात. कोणी म्हातारा झाला आहे. कोणाचें आंग सुजलें आहे. कोणी मरत आहेत. असें कां होतें?" साधूला त्यानें विचारलें.



साधू म्हणाला, "जे कोणी पाप करतात त्यांचें असें होतें. तूं देवाची प्रार्थना करीत बस. म्हणजे असलें दुःख तुला होणार नाहीं."

राजपुत्र घरीं आला. जेवला नाहीं, झोपला नाहीं. सारा दिवस विचार करीत बसला. काय करावें हें त्याला सुचेना. रात्र झाली. सारी मंडळी झोपली. राजा झोपला, राणी झोपली. यशोधरा झोपली. तिचा छोटा बाळही झोपला. सारीं माणसें झोंपलीं. एकटा सिद्धार्थ जागा होता. त्यानें मनांत विचार केला, बरोबर घेतलें एका नोकराला. कोणालाही न सांगतांच निघून गेला. गांवाच्या बाहेर गेला. अंगावरचे



दागदागिने काढले. जरीचे कपडे काढले आणि बांधून नोकराजवळ दिले.

नोकर रडत रडत राजवाड्यांत आला. राजाला सांगितलें, राणीला सांगितलें, सगळ्यांना सांगितलें, “सिद्धार्थ निघून गेला; मला नेलें गांवाबाहेर, दागिने काढले भराभर, कपडे उतरले झरझर, आणि मला म्हणाला, ‘सारे दागिने घे. सारे कपडे घे. राजाकडे नेऊन दे’ आणि आपण निघून गेला.”

राजाला फार वाईट वाटलें. राणीला फार वाईट वाटलें. सगळ्यांनाच फार वाईट वाटलें. राजानें दवंडी पिटविली, “ऐका रे ऐका. राजपुत्र रात्रीं निघून गेला. सगळे त्याला शोधायला चला.” सगळे लोक राजपुत्राला शोधायला निघाले.

कुणी गांवांत गेले, कुणी जंगलांत गेले. सगळीकडे शोध शोध शोधलें. पण राजपुत्र कांहीं सांपडेना !



बरेच दिवस झाले. राजपुत्र एका रानांत गेला. पिंपळाच्या झाडाखालीं बसला. देवाची प्रार्थना करूं लागला. एके दिवशीं काय झालें, त्याला देव दिसला. राजपुत्राला म्हणाला, "तूं शाहाणा झालास. तूं बुद्ध झालास. आतां सगळ्या लोकांना शाहाणे कर."

राजपुत्र सगळ्यांना सांगूं लागला,



"खोटें कधीं बोलूं नका, चोरी कधीं करूं नका. वडिलांस उलट बोलूं नका, कोणाशीं भांडूं नका. कोणाला मारूं नका,

मग देव काय म्हणेल ऐकलंत का? तुम्ही शाहाणे आहांत, तुम्ही शाहाणे आहांत!"

## प्रश्न

१ राजपुत्र फिरायला गेला तेव्हां त्याला काय दिसलें?

२ राजानें दवंडी कां पिटविली?

३ देवानें राजपुत्राला काय सांगितलें?

४ खालील शब्दांचीं वाक्यें लिहा —

(प) गेला, सिद्धार्थ, होता, फिरायला, एकदा.

(फ) बसला, झाडाखालीं, पिंपळाच्या, होता, सिद्धार्थ.

(ब) वेडेंत्राकडें, होतें, त्याचें, झालें, तोंड.

५ खालीं वाक्यांचे दोन भाग करून लिहिले आहेत ते जुळवून लिहा.

| | |
|---|---|
| (य) नोकर रडत रडत | वाईट वाटलें. |
| (र) सारा दिवस | दखील नव्हतें. |
| (ल) राजाला फार | राजवाड्यांत आला. |
| (व) त्याच्याकडे पाहवत | गुडघ्यांत आली होती. |
| (श) त्याची मान | विचार करीत बसला. |

---

★ २ ★

# रामदेवराव यादव

फार फार वर्षें झालीं. देवगिरी नांवाचें मोठें नगर होतें. तिथें एक राजा होता. त्याचें नांव रामदेवराव यादव. तो फार शूर होता. खूप लढाया करी. खूप खूप पैसा मिळवी. इतका पैसा मिळविला, कीं साऱ्या तिजोऱ्या भरून गेल्या. साऱ्या लोकांना कळलें. सारेजण म्हणूं लागले, "राजा रामदेवराव शूर झाला, लढाया करून पैसा मिळविला."

दिल्लीचा राजा जलालउद्दीन. त्याचा पुतण्या होता अल्लाउद्दीन. मोठा शूर वीर. त्याला कळलें, 'राजा रामदेवराव शूर झाला. लढाया करून पैसा मिळविला. आपण जावें त्याच्याबरोबर लढाईला आणि लुटावें त्याला.' त्यानें मनांत विचार केला. कळविलें नाहीं आपल्या काकाला. अल्लाउद्दीन निघाला तो थेट देवगिरी येथें आला. वाटेंत भेटले त्याला राजे. त्यांनीं विचारलें, 'कुठें जातोस?' 'जातों कुठें तरी नोकरी करायला. तुम्ही अडवलंत मला तर सांगेन माझ्या काकाला.' कोणी नाहीं अडविलं त्याला!

अल्लाउद्दीन देवगिरीला आला. रामदेवराव गेला होता देवाच्या दर्शनाला. शंकरदेव त्याचा मुलगा. तोही गेला होता लढाईला.

'आतां काय करायचं? आतां कुठें जायचं? रामदेवरावाला मोठा विचार पडला. शेवटीं देवगिरीच्या किल्ल्यांत जाऊन राहिला. अल्लाउद्दिनानें किल्ल्याला वेढा दिला. रामदेवराव किल्ल्यांत अडकला. खूप दिवस झाले. सारे लोक किल्ल्यांत अडकले. किल्ल्यांतलें धान्य संपूं लागलें. आणखी असें झालें, कीं कोठारांतलें जें पोतें काढावें तें मिठाचें निघूं लागलें. सारीच फजिती! कोणी लबाडानें कोठारांत मिठाचीं पोतीं भरलीं होतीं कोणास ठाऊक! आतां खायचें काय? रामदेवरावाला मोठा विचार पडला. शेवटीं किल्ल्याच्या बाहेर आला. अल्लाउद्दिनाला म्हणाला, "काय करूं बाबा! किल्ल्यांतलें धान्य संपलें. सारे लोक उपाशी मरूं लागले. पाहिजे तर पैसे घे. आणखी अर्धें राज्य घे. पण निघून जा पाहूं कसा."

अल्लाउद्दीन खरं म्हणाला. पण इतक्यांत शंकरदेव धावत आला. "हर हर महादेव, हाणा मारा ठोका!" जोराजोरानें लढूं लागला, अल्लाउद्दिनाचा पराभव झाला. अल्लाउद्दीन पळून



जाऊं लागला. पण काय झालें. आकाशांत धुरळा उडताना दिसला. शंकरदेवाला वाटलें दिल्लीचा बादशाहा लढाईला आला. तो घाबरून पळून गेला.

बादशाहा कुठें आला होता? शेजारचे राजे लोकच आले होते शंकरदेवाच्या मदतीला. पण काय साराच बेत फसला! अल्लाउद्दीन परत फिरला. रामदेवरावाचा पराभव झाला. सारें राज्य घेतलें अल्लाउद्दिनानें; शाबासकी दिली जलालउद्दिनानें.

### प्रश्न

१ देवगिरीचा राजा कोण? दिल्लीचा राजा कोण?

२ शंकरदेव कोठें गेला होता?

३ "पाहिजे तर पैसे घे आणखी अर्धें राज्य घे." असें रामदेवराव कां म्हणाला?

४ रामदेवराव किल्ल्यांत कां राहिला?

२९५०५
का. वा.
१५०६
९-४-६१

५ खालीं वाक्यांचे दोन भाग करून लिहिले आहेत ते जुळवा.

| | |
|---|---|
| (प) देवगिरी नांवाचें मोठें | वेढा दिला. |
| (फ) अल्लाउद्दिनानें किल्ल्याला | हाणा मारा ठोका ! |
| (ब) सारे लोक उपाशी | नगर होतें. |
| (भ) हरहर महादेव | उडतांना दिसला. |
| (म) आकाशांत धुरळा | मरूं लागले. |

---

★ ३ ★

# दामाजीपंत


बहामनी राज्य होतें. त्यांत मंगळवेढें गांव होतें. तेथें एक कमाविसदार होता. त्याचें नांव दामाजी. मोठा देवभक्त होता. काम संपलें कीं विठोबाचें भजन करी.

त्या वेळीं सरकारला शेतसारा देत तो पैसे न देतां धान्यच देत. धान्याचीं कोठारेंच्या कोठारें भरलीं होतीं.

एकदा काय झालें; मोठा दुष्काळ पडला. धान्य पिकलें नाहीं. चारा झाला नाहीं. पाणी मिळेना. गुरेंढोरें पटापट मरूं लागलीं. माणसांना खायला अन्न मिळेना. जिकडे तिकडे रडारड सुरू झाली. पण काय करणार ?

दामाजीपंत आपलें काम आटोपून जेवायला बसला होता. इतक्यांत एक ब्राह्मण रडत रडत आला. "काय करूं. खायला नाहीं, प्यायला नाहीं. बायका पोरें उपाशीं मरत आहेत." दामाजीला दया आली. त्याला एक वर्ष पुरेल इतकें धान्य दिलें. साऱ्या लोकांना कळलें. "दामाजीनें

ब्राह्मणाला धान्य दिलें." सारे लोक ओरडत आले. हातीं



पायीं पडूं लागले. "खायला नाहीं, प्यायला नाहीं. मुलेंबाळें उपाशीं मरत आहेत!"

दामाजीपंतानें विचार केला आणि म्हणाला, "कोठारांतलें धान्य घेऊन जा." साऱ्या लोकांना आनंद झाला. जो उठला तो धान्य नेऊं लागला. सारीं कोठारें संपलीं. एवढ्या लोकांचे जीव वांचले. दामाजीला आनंद झाला. आनंदाच्या भरांत विठोबाचें भजन करूं लागला.

दामाजीनें सरकारचीं सारीं कोठारें लुटवलीं. ही बातमी सुलतानास समजली. सुलतानाला राग आला. त्यानें दामाजीला पकडलें आणि कैदेंत ठेविलें.



देवाला राग आला. इतक्या लोकांचे प्राण वांचले पण सुलतानानें दामाजीला कैदेंत ठेवलें! सुलतानाची मुलगी आजारी पडली. वैद्य बोलाविले. हकीम बोलाविले. नानातऱ्हेचीं औषधें दिलीं. पण कांहीं केल्या गुण पडेना. शेवटीं पंढरीचा विठू,



महार झाला. बादशाहाकडे आला आणि म्हणाला, "दोन लाख रुपये दिलेत मला तर औषध देऊन बरी करतों मुलीला."

विठूनें मुलीला औषध दिलें. मुलगी बरी झाली. बादशाहाला आनंद झाला. दोन लाख रुपये दिले विठूला. विठू हसत नाचत गांवाला गेला.

पण दामाजीला तुरुंगांत टाकलें ही गोष्ट समजली त्याला. विठू महार दरबारांत गेला. किंमतीचा सारा पैसा सरकारांत भरला. पावतीचा कागद लिहून घेतला आणि कैदेंतून सोडविलें दामाजीला. दामाजीला आनंद झाला. विठूला कडकडून भेटला. मोठमोठ्यानें गाऊं लागला.

दामाजीनें कोठार लुटलें.
सुलतानानें तुरुंगांत टाकलें.
पंढरीच्या विठ्याला कळलें.

झाला विठू महार आला विठू महार.
सारा पैसा भरून टाकला.
दामाजीला जाऊन भेटला.
दामाजीला आनंद झाला.
आला विठू महार झाला विठू महार.

## प्रश्न

१ दामाजीनें धान्य कां लुटवलें ?

२ विठू महाराजवळ एवढे पैसे कोठून आले ?

३ दामाजीला आनंद कां झाला ? आनंदाच्या भरांत तो काय म्हणाला ?

४ खालील वाक्यें बरोबर करून लिहा.

(त) दामाजीनें मुलीला औषध दिलें.
(थ) मोठा दुष्काळ पडल्यामुळें धान्य खूप पिकलें.
(द) सुलतान विठोबाचें भजन करी.
(ध) दामाजीनें विठूला कैदेंत ठेवलें.

---

★ ४ ★

# पृथ्वीराज चव्हाण

एक अनंगपाळ राजा होता. त्याला मूलबाळ नव्हतें. त्यानें देवीला नवस केला. देवी नवसाला पावली. त्याला दोन मुली झाल्या. दोन्ही मुली अगदीं सुंदर होत्या. राजा त्यांना घेऊन सारा दिवस खेळत बसे. मुली मोठ्या झाल्या. राजानें त्यांचीं

लग्नें केलीं. एक झाली चव्हाण राजाची राणी. एक झाली राठोड राजाची राणी. पुढें दोघींनाही मुलगे झाले. एकीचा मुलगा पृथ्वीराज चव्हाण व दुसरीचा जयचंद राठोड.



पृथ्वीराज मोठा देखणा होता. ज्याला त्याला तो आवडत असे. अनंगपाळाला तर तो फारच आवडूं लागला. तो जेथें जाई तेथें पृथ्वीराजाला बरोबर घेऊन जाई. फिरायला गेला तरी त्याला नेई. दरबारला गेला तरी त्याला नेई. लढाईला गेला तरी त्याला नेई! पण जयचंदाला कोणीच नेत नसे. जयचंदाला राग येई. मनांतल्या मनांत पृथ्वीराजाला शिव्या देई.

दोघेही मुलगे मोठे झाले. अनंगपाळानें सारें राज्य पृथ्वीराजास दिलें. जयचंदास कांहींच दिलें नाहीं.

पृथ्वीराजास आनंद झाला. पण जयचंदास राग आला. जयचंद म्हणाला, 'थांब! पाहून घेईन तुला.' दोघांचा वाद सुरू झाला. जयचंदानें महंमद घोरीला बोलाविलें आपल्या मदतीला. निघाला पृथ्वीराजाबरोबर लढाई करायला. पृथ्वीराजा फार शूर. घोडा उडविला चौखूर.

सरसर सरसर तलवार फिरवून पाडले रक्ताचे पूर! महंमद




घोरीला पकडलें, चार वेळां आपटलें. "पुन्हा करशील असले चाळे तर पाणी पाजीन काळें का ळें!" असें म्हणून त्याला सोडून दिलें. जयचंदाची मुलगी संयुक्ता. किती सुंदर होती ती! ती म्हणाली बापाला, "पृथ्वीराजा किती शूर आहे. मला तो फारच आवडतो. मी त्याच्याबरोबरच लग्न करणार!"

संयुक्ता मोठी झाली. जयचंदानें संयुक्तेचें स्वयंवर करण्याचा निश्चय केला. साऱ्या राजपुत्रांना बोलाविलें. पण पृथ्वीराजाला कांहीं बोलाविलें नाहीं. दिवस ठरला. मंडप उभारला. सगळीकडे आरास केली. वाजंत्रींवाले वाजंत्रीं वाजवूं लागले. जिकडे तिकडे अत्तराचा वास सुटला. भरजरी कपडे केलेले, सोन्याचांदीचे मुकुट घातलेले, देशदेशचे राजपुत्र आले. निरनिराळ्या जागीं जाऊन बसले.


वेळ झाली. हातांत माळ घेऊन संयुक्ता बाहेर आली. साऱ्या राजपुत्रांनीं वाजविली टाळी. जो तो म्हणे, 'आली रे आली.'

सगळीकडे फिरली. पण कोणाच्याही गळ्यांत माळ नाहीं घातली.



फिरतां फिरतां दाराजवळ आली. तों तेथें पृथ्वीराजाचा पुतळा दिसला. त्याच्याच गळ्यांत माळ घातली.

पृथ्वीराजा वेष पालटून शेजारीं उभा होता. त्यानें संयुक्तेला हळूच उचलली. घोड्यावर बसविली आणि धूम ठोकली.



'हें काय? हें काय?' सारे राजपुत्र ओरडले.

'धावा, धावा; पकडा, पकडा!' मोठ्यानें ओरडत जयचंद आला. पण पृथ्वीराज पळाला तो कोणाला सांपडलाच नाहीं.

### प्रश्न

१ अनंगपाळाचे नातु कोण ?

२ संयुक्ता ही कोणाची मुलगी होती ?

३ पृथ्वीराजानें कोणाचा पराभव केला ?

४ संयुक्तेनें कोणाच्या गळ्यांत माळ घातली ?

५ खालील वाक्यांत गाळलेल्या जागीं योग्य शब्द लिहा:—

(प) अनंगपाळानें आपलें सारें राज्य ——————— दिलें.

(फ) पृथ्वीराजा ————— पालटून ————————— होता.

(ब) जिकडे तिकडे —————— वास सुटला.

(भ) जयचंदाची मुलगी ———————————

(म) ——————— मोठा देखणा ———————

---

★ ५ ★

## ज्ञानेश्वर

आपेगांव म्हणून एक गांव होतें. तिथें एक ब्राह्मण राहात होता. त्याचें नांव विठ्ठलपंत. तो फार हुशार होता.

आळंदी येथें एक कुळकर्णी राहात होते. त्यांचें नांव सिद्धोपंत. त्यांना एक मुलगी होती. तिचें आणि विठ्ठलपंतांचें लग्न झालें. कांहीं दिवस झाले. विठ्ठलपंतांना वाटलें, "आपण काशीस जावें. देवाची सेवा करावी. संन्यासी व्हावें."

एके दिवशीं काय झालें, विठ्ठलपंत सकाळींच उठले, घराबाहेर पडले आणि काशीला पळून गेले. कोणाजवळ बोलले नाहींत आणि कांहीं सांगितलें नाहीं.



काशीला रामानंद-स्वामी राहात होते. सारे पंडित त्यांच्यापुढें मान वाकवीत. हें विठ्ठलपंतांना माहीत होतें. विठ्ठलपंत म्हणाले, “मला साधु व्हावयाचें आहे! संन्यासी व्हावयाचें आहे!”

रामानंदांनीं त्यांना संन्यासी बनविलें. विठ्ठलपंत देवाची प्रार्थना करूं लागले. सारे लोक त्यांच्या पायां पडूं लागले. पुढें काय झालें, रामानंदस्वामी फिरत फिरत आळंदीला आले. विठ्ठलपंतांची बायको रुक्मिणी पिंपळाला फेऱ्या घालीत होती. रामानंदस्वामींना पाहातांच त्यांना तिनें नमस्कार केला. स्वामींनीं तिला आशीर्वाद दिला, “तुला मुलगा होईल!” रुक्मिणी हसली. “हसलीस कां?” स्वामींनीं विचारलें.

“माझा नवरा विठ्ठलपंत काशीला पळून गेला. स्वामींनीं त्याला संन्यास दिला. मग आतां कसा होईल मुलगा मला?” रुक्मिणीनें विचारलें.



स्वामी काशीला गेले. विठ्ठलपंतांना म्हणाले, ‘ तूं आपल्या घरीं परत जा. ’

विठ्ठलपंत परत आले. संसार करूं लागले. त्यांना चार मुलें झालीं. निवृत्ति, ज्ञानदेव व सोपान हे तीन मुलगे आणि मुक्ताबाई ही मुलगी. मुलें मोठीं हुषार होतीं. पण त्यांच्याजवळ कोणी मुलें खेळत नसत. कारण तीं संन्याशाचीं मुलें ! विठ्ठलपंतांकडे शेजारी-पाजारी कोणी येत नसत. कारण तो संन्याशाचा संसारी झाला होता ना !

मुलगे मोठे झाले. मुंजीचें वय झालें. पण सारे भटजी म्हणाले, ‘ हीं संन्याशाचीं मुलें. ’

कोणी मुंजीला येईना. विठ्ठलपंताला वाईट वाटलें. रुक्मिणीला वाईट वाटलें. त्यांना इतकें दुःख झालें कीं तीं लवकरच देवाघरीं गेलीं !

“ आईबाप गेले देवाकडे. मग पाहाणार कोण आमच्याकडे ? ” सगळीं मुलें निघालीं. पैठणला आलीं. मोठमोठे पंडित राहत



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 3358 नों दि. .... ....
वि. ...



होते पैठणला. मुलांनीं त्यांच्याशीं वाद केला. आकाशांतून देव म्हणाला, ' किती शाहाणीं मुलें, सारे पंडित हरून गेले. '

एकदां काय झालें, पंडितांनीं वेद म्हटले. मोठमोठ्यांनीं म्हणूं लागले. पण ज्ञानदेवानें काय केलें; रेड्याला सभेंत आणलें. त्याच्या डोक्यावर हात ठेवला. तोंच रेड्यानें मोठ्यानें वेद म्हणून दाखविले. सारे पंडित आश्चर्यचकित झाले. त्यांना वाटलें देवाचे अवतारच आहेत हीं मुलें. सारे पंडित हात जोडून उभे राहिले. ज्ञानदेवाला म्हणाले, 'आम्ही हरलों, आम्ही हरलों. '

एकदां चांगदेव साधु वाघावर बसला. हातांत सापाचा चाबूक घेतला. ज्ञानदेवाला भेटायला निघाला.

ज्ञानदेवानें विचार केला. चांगदेव वाघावर बसून येत आहे. आपण काय करावें? एका भिंतीवर बसला. हातांत दोरीचा चाबूक घेतला. मागें बसविलें भावांना आणि बहिणीला. चांगदेवाला सामोरा गेला.

चांगदेव लाजला. वाघावरून खालीं उतरला. पाय धरून ज्ञानदेवाला नमस्कार केला.



ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी, लोकांना आवडते भारी
पंढरीचा वारकरी, एकसारखें कीर्तन करी.
"कृष्णार्जुनाची कथा ज्ञानदेवाच्या ज्ञानेश्वरींत वाचा."

### प्रश्न

१ ज्ञानदेवानें कोणते चमत्कार केले?
२ विठ्ठलपंत पळून कुठें गेले?
३ स्वामींनीं रुक्मिणीला कोणता आशीर्वाद दिला?
४ ज्ञानेश्वरींत कोणाची कथा आहे?

---

★ ६ ★

# बादशाहा बाबर

खूप खूप लांब एक देश होता. त्याचें नांव फरघाना. तेथें एक मुसलमान राजा होता. त्याला एक मुलगा होता. त्याचें नांव बाबर. कांहीं दिवसांनीं राजा मेला तेव्हां बाबर राजा झाला. पण बाबर लहान होता. कांहीं लोकांनीं बेत केला. बाबरला हाकून लावला. बाबर इकडे तिकडे भटकूं लागला. भूक नाहीं तहान नाहीं. वाटेल तिकडे पडून राही.



एके दिवशीं काय झालें, फिरतां फिरतां दमला. रानांतच झोपला. त्याच्या स्वप्नांत अल्ला आला. त्याला म्हणाला, "बाबरा, तूं फार शूर आहेस. असा भटकूं नकोस. थोडथोडें सैन्य जमव आणि लढाया करून पैसे मिळव!" बाबर जागा झाला. उठून



उभा राहिला. लागला सैन्य जमवायला. खूप सैन्य जमविलें, शूर, शूर लोक गोळा केले. त्यांना सांगितलें, "नोकरी कराल माझ्याकडे तर देईन तुम्हांला भरजरी कपडे!" बरेच लोक जमले. अफगाणिस्तानावर चालून गेले. अफगाणिस्तानचें राज्य जिंकून घेतलें. बाबर अफगाणिस्तानचा बादशाहा झाला.

थोडे दिवस झाले. बाबराला वाटलें आपण आणखी राज्य मिळवावें! दिल्ली येथें इब्राहिम लोदी राज्य करीत होता. बाबरानें त्याच्यावर स्वारी केली. इब्राहिमचा पराभव झाला. दिल्ली राजधानी जिंकून घेतली. इब्राहिम पळून गेला. बाबर दिल्लीचा बादशाहा झाला.

राणा संग रजपूत सरदार. होता शूर फार, कधीं कुणाला जाणार नाहीं हार. राज्य मिळवावें असें मनांत होतें फार. पण काय करणार? दिल्लीचा बादशाहा बाबर, होता शूर फार.

त्याचें राज्य काय राण्याला मिळणार ? पण राजा म्हणाला, "प्रयत्न केला तर काय नाहीं मिळणार ?"

मोठें सैन्य घेऊन निघाला. दिल्लीवर चालून आला. बाबर मनांत घाबरला. "एवढा मोठा संग राणा लढाईला आला. आतां कसें होणार ?" त्यानें बोलाविलें अल्लाला, "जर लढाईत जय मिळाला तर शिवणार नाहीं दारूला," अल्ला नवसाला पावला. बाबराला जय मिळाला. शिवला नाहीं कधीं दारूला.

बाबराचा मुलगा हुमायून एकदां आजारी पडला. वैद्य आला. हकिमाला बोलावला. पण कांहीं केल्या गुण पडेना. आतां काय



करावें ? बाबराला विचार पडला. अल्लाला शरण गेला. "अल्ला, माझें आयुष्य दे हुमायुनाला. पण बरा कर त्याला !" हुमायून बरा झाला. बाबराला आनंद झाला. पण इतक्यांत बाबर आजारी पडला. अल्लानें आपल्या घरीं नेलें त्याला.

## प्रश्न

१ बाबराला अल्लानें काय सांगितलें ?

२ बाबरानें दारू कां सोडली ?

३ हुमायून आजारी पडला तेव्हां बाबरानें अल्लास काय सांगितलें ?

४ खालील वाक्यांत गाळलेल्या जागीं योग्य शब्द लिहा.

(य) नोकरी कराल माझ्याकडे तर देईन ————

(र) अल्ला नवसाला ————

(ल) एकदां ———— आजारी पडला.

(व) राणा संग ———— सरदार होता.

---

★ ७ ★

# बादशाहा अकबर

हुमायून आजारांतून साफ बरा झाला. दिल्लीचें राज्य करूं लागला. इतक्यांत शेरशहा नांवाचा शूर सरदार आला. हुमायुनाबरोबर तो लढला. हुमायुनाचा पराभव झाला. हुमायून पळून गेला.



हुमायून पळाला तो आपल्या भावांकडे गेला. पण कोणींहि मदत केली नाहीं त्याला. बरोबर बायकोला घेऊन इकडे तिकडे भटकूं लागला. भटकतां भटकतां दमला. झाडाच्या आसऱ्याला बसला. इतक्यांत

त्याच्या बायकोला मुलगा झाला. हुमायून सावध झाला. बायकोला आणि मुलाला टाकून पळाला.

तिकडून चुलता आला आणि त्यानें हुमायुनाच्या बायकोला पकडलें. मुलाला बरोबर घेतलें. दोघांना कैदेंत ठेविलें.

हुमायून पळाला तो इराणच्या बादशाहाकडे गेला. त्याची मदत घेऊन आला. भावाबरोबर लढूं लागला. तोफांचा भडिमार सुरू झाला. हुमायुनाचा भाऊ घाबरला. पण त्यानें



काय केलें, अकबराला उचललें आणि किल्ल्याच्या तटावर ठेविलें. तरीसुद्धां हुमायुनानें मागें पुढें पाहिलें नाहीं.

चकमक विजा चमकल्या. सरसर तलवारी फिरल्या. गडगड ढग गडगडले. धडाधड तोफांचे आवाज झाले. हुमायुनाला जोर चढला. भावाला पळवून लावलें पण अकबराचें नशीब भलें!

हुमायून धावत गेला. उचललें अकबराला. हळूच एक मुका घेतला आणि म्हणाला, "अरे लबाडा! मला सोडून चालला होतास काय? मला सोडून गेलास तर दिल्लीचा राजा कोण होणार?"

लवकरच अकबर बादशाहा झाला. दिल्लीच्या गादीवर बसला. तेरा वर्षांचा छोटा राजा दिल्लीचा बादशाहा झाला.

बहिरामखानानें अकबराला लिहायला शिकविलें; वाचायला शिकविलें; लढाईचें शिक्षण दिलें. राज्यकारभाराचें शिक्षण दिलें.

कांहीं सरदार अकबराला त्रास देऊं लागले. अकबराच्या दाईचा एक मुलगा होता. तो फार दुष्ट होता. ज्याला त्याला त्रास देई.

एकदां दरबार भरला होता. लोक दरबारांत बसले होते. दरबारांत येऊन त्यानें वजिराला ठार मारलें. सारे लोक मोठ्यानें ओरडले. 'खून! खून!' अकबराला राग आला. तो नोकरांना म्हणाला, "याला उचला आणि खालीं फेका!" नोकरांनीं त्याला उचललें आणि खालीं फेकलें. त्यामुळें तो



मेला. पण एवढ्या गोष्टीनें सगळ्यांना धाक बसला. जो तो अकबराला भिऊन वागूं लागला.

अकबर बादशाहा न्यायी होता. तो सगळ्यांना योग्य न्याय देई. तो मुसलमान होता पण कधीं हिंदूंना छळीत नसे. हिंदु लोक त्याच्याकडे नोकरीला होते. मोठमोठे हिंदु पंडित त्याच्या दरबारांत होते. त्याच्याकडे एक बिरबल होता. तो बादशाहाला गमतीजमतीच्या गोष्टी सांगे.

एकदां बादशाहा खुर्चीवर बसला. समोर टेबलावर उकडलेला बटाटा ठेवला. बिरबलला म्हणाला, "हात न लावतां चटकन्



नाहींसा करा पाहूं." बिरबलानें चटकन् तोंड लावलें आणि हात न लावतां बटाटा नाहींसा केला !

## प्रश्न

१ हुमायुनाचें राज्य कोणीं घेतलें ?

२ वजिराला कोणीं ठार मारलें !

३ हुमायुनानें कोणाची मदत घेतली ?

४ अकबर बादशाहा झाला तेव्हां किती वर्षांचा होता ?

५ ( क ) हुमायुनाच्या ———— अकबराला ———— वर ठेविलें.

( ख ) ———— अकबराला शिक्षण दिलें.

( ग ) ———— बादशाहाला गमतीच्या गोष्टी सांगे.

( घ ) बिरबलानें हात न लावतां ———— नाहींसा केला.

वरील वाक्यांत गाळलेल्या जागीं योग्य शब्द लिहा.

★ ८ ★

## चांदबिबी

अहमदनगर नांवाचें मोठें नगर होतें. तेथें निजामशहा राज्य करीत होता. त्याला एक बहीण होती. तिचें नांव चांदबिबी. मोठी हुषार होती. साऱ्या लोकांना ती आवडे. सारे लोक तिचें कौतुक करीत. तिला लिहितां येत होतें. वाचतां येत होतें. ती घोड्यावर बसे. लकलक तलवार फिरवी. सरसर भाला फेकी. भारी शूर! भारी शूर!



चांदबिबी मोठी झाली. लग्नाची तयारी झाली. विजापूरच्या बादशाहाची राणी झाली. चांदबिबी शूर तसा बादशाहाही शूर. दोघेही लढाईला जात.

पण पुढें काय झालें, चांदबिबीचें दुर्दैव ओढवलें! बादशाहास अल्लानें आपल्या घरीं नेलें. सारे लोक हळहळले!

पण चांदबिबी शूरापेक्षां शूर. नाहीं घाबरली. नाहीं रडली. तिचा लहान पुतण्या होता. त्याला गादीवर बसविलें आणि आपण राज्यकारभार सुरू केला. ती उत्तम न्याय करी. साऱ्या

लोकांना आवडूं लागली. जिकडे तिकडे कीर्ति पसरली. पण प्रधानाची स्वारी चिडली. त्यानें चांदबिबीला पकडलें आणि कैदेंत ठेवलें.

पण चांदबिबी गुपचुप पळाली. भावाकडे आली. सुखानें राहूं लागली. कोणी लबाड माणूस आला. ठार मारलें तिच्या भावाला. जिकडे तिकडे गोंधळ उडाला.

दिल्लीला अकबर बादशाहा होता. आपलें राज्य वाढवीत होता. मुराद त्याचा मुलगा. त्याच्याजवळ मोठें सैन्य दिलें आणि अहमदनगरावर स्वारी करण्यास पाठविलें. चांदबिबीला समजलें. तिनें सारें सैन्य तयार ठेविलें.

मुराद आला. किल्ल्याला वेढा घातला. महिना झाला. वर्षाचा काळ गेला. पण चांदबिबीनें दाद दिली नाहीं त्याला. शेवटीं मुरादनें सुरुंग लावला. मोठें खिंडार पाडलें तटाला. त्यामधून आंत शिरला. "या अल्ला! या खुदा!" मोठ्यानें ओरडला. सरसर भरभर तलवार फिरवूं लागला.

चांदबिबीचें सारें सैन्य घाबरलें. वाट फुटेल तिकडे पळूं लागलें. चांदबिबीला कळलें. ताबडतोब आंगांत चिलखत चढविलें. हातांत तलवार घेतली आणि पुढें आली. साऱ्या लोकांना ओरडून म्हणाली, "असे पळतां कुठें? व्हा पुढें आणि शत्रूचे पाडा मुडदे." सारे लोक मागें फिरले. जोरजोरानें लढूं लागले. इतके लढले कीं मुरादचें सैन्य घाबरून गेलें.



रात्र झाली. चांदबिबी तटाच्या खिंडाराशीं आली. सारें खिंडार बांधून काढलें. दुसऱ्या दिवशीं मुरादनें पाहिलें. पण काय ? सारें खिंडार बांधलेलें.

" चांदबिबी म्हणजे जसा कांहीं ' शूर सरदार ! '
कधीं कुणाला जाणार नाहीं हार. "
असें म्हणून मुराद निघून गेला.

### प्रश्न

१ चांदबिबीचें लग्न कोणाबरोबर झालें ?

२ मुराद कोणाचा मुलगा होता ?

३ खालीं दिलेलीं वाक्यें बरोबर करा.

(श) बाबरानें तटाला खिंडार पाडलें.

(ष) चांदबिबीनें मुलाला गादीवर बसविलें.

(स) चांदबिबीला लिहितां वाचतां येत नव्हतें.

★ ९ ★

# तुकाराम

देहू नांवाचें एक गांव होतें. तिथें एक दुकानदार होता. त्याचें नांव बोल्होबा. तो जातीनें मराठा होता. बोल्होबाला एक मुलगा होता. त्याचें नांव तुकाराम. तुकाराम मोठा देवभक्त होता. उठतां बसतां त्याचें आपलें पांडुरंगाचें भजन चालू!



तुकाराम लहान असतांनाच त्याचीं दोन लग्नें झालीं. मोठा झाल्यावर तो आपल्या बापाचें दुकान चालविण्यास मदत करूं लागला. कांहीं दिवसांनीं बोल्होबा वारला. दुकान चालविण्याचें काम तुकारामावर पडलें. पण त्याला तें कांहीं जमेना. सगळे लोक फसवूं लागले. तुकाराम पडला भोळा. दुकानांत तोटा येऊं लागला.

एकदां तुकाराम मिरच्या घेऊन कोंकणांत विकावयास गेला. पण तुकारामाला साऱ्या लोकांनीं फसविलें. परत

येतांना त्याला एक सोनार भेटला. त्यानें तुकारामाला सोन्याचीं कडीं विकत दिलीं. पण तीं होतीं पितळेचीं. तुकाराम घरीं आला. बायकोला सोन्याचीं कडीं दाखविलीं. बायकोनें कडीं पाहिलीं. पण तीं होतीं पितळेचीं. तणतणा बोलली. बोलून नाहीं थांबली. काठी आणली आणि तिनें तुकारामाला बडविलें. तरीसुद्धां तुकाराम रागावला नाहीं. उलट विठोबाचें भजन करूं लागला.

एकदां मुलांना ऊस आणण्यासाठीं तुकाराम बाजारांत गेला. बरेचसे ऊस विकत घेतले. घरीं येतांना वाटेंतल्या मुलांनीं त्याला लुटलें. शेवटीं एक ऊस राहिला. बायकोला समजलें. तो ऊस घेऊन रागारागानें तुकारामाच्या पाठींत मारला. मारतां मारतां ऊस मोडला. तीन तुकडे झाले. तुकाराम हसत म्हणाला, "एका उसाचे तीन तुकडे झाले. आतां एक मुलांना दे, एक तूं खा आणि एक मी खातों."

तुकाराम नेहमीं भजन करीत असे. भजनापुढें त्याला दुसरें कांहीं सुचत नसे. घरांतलें धान्य संपलें होतें. बायको ओरडूं लागली, " धान्य संपलें, धान्य आणा, धान्य संपलें, धान्य आणा. घरांत खायला एक दाणाही नाहीं. गांवांत जाऊन भीक तरी मागा !"

" छे छे छे ! भीक मागूं ? मला कोण घालील भीक ? धडधाकट माणूस मी. कुठें तरी जातों. काम करतों. आणि पोटाला चार दाणे मिळवून आणतों. " तुकाराम म्हणाला.

घरून निघाला. गांवच्या पाटलाकडे गेला. "कांहीं काम देतां का मला ?" शेत राखण्याचें काम दिलें तुकोबाला.



तुकाराम शेतावर गेला. भजन करीत बसला. भजनांत अगदीं दंग झाला. तिकडून पांखरांचा मोठा थवा आला. शेतांतला सगळा दाणा खाऊन टाकला. पाटील शेतावर आला. पाहातो तों सारा दाणा पांखरांनीं खाल्ला. रागारागानें तुकारामाला बोलला.

पण चमत्कार काय झाला, पाटलानें दाणा मोजून पाहिला. नेहमींपेक्षां दाणा जास्त झाला. पोतींच्या पोतीं गाड्यांत भरलीं. तुकारामाकडे धावत आला आणि म्हणाला, "महाराज, क्षमा करा मला! मी उगीचच बोललों तुम्हांला. यंदा दाणा खूपच पिकला. जास्त झालेला तुमचा. म्हणूनच तुमच्याकडे आणला आहे."

"पांडुरंगाची कृपा! पांडुरंगाची कृपा! सारा दाणा गरीबांना वांटून टाका." तुकाराम म्हणाला.

सारा दाणा गरीबांना वांटला. पण बायकोनें मार दिला तुकारामाला. तरीही तुकाराम रागावला नाहीं. उलट आनंदानें भजनच करूं लागला!

एकदां शिवाजीमहाराजांनीं उंची उंची कपडे आणि दागिने तुकारामाकडे पाठविले. राजवाड्यांत बोलाविलें. पण तुकारामानें कपडे घेतले नाहींत, दागिने घेतले नाहींत. "आम्हांला दागिने नकोत, कपडे नकोत. तुमचे तुम्ही परत घ्या. तुमच्याकडें येऊन आम्ही काय करणार?" असा निरोप पाठविला.

शेवटीं शिवाजीमहाराज घोड्यावर बसून तुकारामाकडे गेले आणि तुकारामाचे पाय धरले.

प्रश्न

१ तुकारामाला बायकोनें किती वेळां मारलें ? कां ?

२ शिवाजीनें पाठविलेले कपडे तुकारामानें परत कां पाठविले ?

३ पाटलाच्या शेतांत धान्य जास्त कसें पिकलें ?

४ तुकारामानें आणलेले ऊस कोणीं खाल्ले ?

५ तुकाराम भिक्षा मागायला कां गेला नाहीं ?

★ १० ★

# श्रीसमर्थ रामदासस्वामी


गोदावरी नदीच्या कांठीं जांब गांव आहे. तेथें एक कुलकर्णी होते. त्यांचें नांव सूर्याजीपंत ठोसर. बायकोचें नांव राणूबाई. दोघेंही मोठीं रामाचीं भक्त होतीं. रामनवमीच्या दिवशीं राणूबाईस मुलगा झाला. त्याचें नांव नारायण ठेवलें.



नारायण लहान असतांनाच आईनें त्याचें लग्न ठरविलें. सगळी तयारी झाली. भटजी मोठमोठ्यानें म्हणूं लागले, "शुभ मंगल सावधान!" नारायणाला वाटलें,

भटजी ओरडून सांगत आहेत, 'तूं सावध हो.' नारायण सावध झाला. मनांत विचार केला आणि पळून गेला. तो थेट नाशिक येथें गेला.

पंचवटींतल्या रामाचें दर्शन घेतलें. दररोज गोदावरी नदींत उभा राही आणि रामाची प्रार्थना करी. अशीं बारा वर्षें झालीं. श्रीराम प्रसन्न झाले आणि नारायणाला दर्शन दिलें. नारायणाला आनंद झाला.



लग्नामध्यें पळून गेला. गोदावरींत उभा राहिला. राम आला भेटायला. नारायणाचा रामदास झाला.

सारे लोक नारायणाला रामदास म्हणूं लागले. रामदास तीर्थयात्रा करीत फिरूं लागला. गांवागांवांतून मारुतीचीं देवळें बांधलीं. लोकांना व्यायाम करण्यास सांगितलें. रामनवमीच्या दिवशीं मोठा उत्सव सुरू केला.

शिवाजीनें रामदासांना आपले गुरु केलें. एके दिवशीं शिवाजी वाड्यांत एकटाच बसला होता. त्याला वाटलें,



"आपण एवढ्या लढाया करतों. खूप खूप माणसें मरतात. आपल्याला पुष्कळ पाप लागतें. त्यापेक्षां हें राज्य कोणाला तरी देऊन टाकावें आणि कुठेतरी जाऊन देवाची भक्ति करीत बसावें." इतक्यांत, 'जय जय रघुवीर समर्थ' असा आवाज ऐकूं आला. रामदासांचाच हा आवाज! तावडतोब शिवाजी उठला. एका कागदावर लिहिलें, 'सर्व राज्य तुम्हांस दिलें.' आणि तो कागद स्वामींच्या झोळींत टाकला. पायांवर लोटांगण घातलें. रामदासांनीं चिठी वाचून पाहिली आणि म्हटलें, "शिवबा, राज्य मला दिलेंस पण तें सांभाळणार कोण? तें सांभाळण्यासाठी मला तूं पाहिजेस. तेव्हां आतां असें कर, माझेंच

राज्य पण सांभाळ तूं. माझ्या राज्याची खूण म्हणून झेंडा भगवा कर!"

रामदासांनीं मनाला उपदेश केला. तो 'मनाचे श्लोक' म्हणून प्रसिद्ध आहे. 'दासबोध' म्हणून एक पुस्तकही लिहिलें.

रामदास फिरत फिरत आपल्या घरीं आले. आईला भेटले. पण आईचे डोळे गेलेले. ती म्हणाली, "काय करूं, तुला पाहावेंसें वाटतें. पण मला दिसत नाहीं." रामदासांनीं आईच्या डोळ्यांवरून हात फिरविला. आईला दिसूं लागलें. तिला मोठा आनंद झाला.

## प्रश्न

| | गोष्ट | कारण |
|---|---|---|
| १ | १ लग्नांत पळाला. | |
| | २ आईच्या डोळ्यांवरून हात फिरविला. | |
| | ३ झेंडा भगवा कर. | |

२ रामदास हें नांव कसें पडलें ?

३ शिवाजीला त्यांनीं काय उपदेश केला ?

४ रामदासांनीं कोणतीं पुस्तकें लिहिलीं ?

---

★ ११ ★

# छत्रपति शिवाजीमहाराज

शहाजी भोसले नांवाचा मराठा सरदार होता. विजापूरच्या बादशाहाकडे नोकरीस होता. त्याच्या बायकोचें नांव जिजाबाई. शहाजीला एकसारखें लढाईला जावें लागे. म्हणून त्यानें

जिजाबाईला शिवनेरीच्या किल्ल्यांत ठेविलें. किल्ल्यांत शिवाईचें



देऊळ होतें. तिच्या दर्शनाला जिजाबाई नेहमीं जात असे. एकदां तिनें देवीला नवस केला. 'मला मुलगा झाला तर त्याला तुझें नांव ठेवीन.'

देवी नवसाला पावली. लवकरच जिजाबाईला मुलगा झाला. शिवाईचें नांव ठेविलें आपल्या मुलाला. तोच शिवाजी राजा झाला!

शिवाजी मोठा होऊं लागला. लढाईचा खेळ त्याला आवडे. जिजाबाईनें त्याला गोष्टी सांगितल्या. रामलक्ष्मण, कृष्ण, कौरवपांडव यांच्या गोष्टी त्याला फार आवडत, अभिमन्यूची गोष्ट तर त्याला फार आवडे. "अभिमन्यूनें कसा पराक्रम केला, अभिमन्यू बाळ कसा लढला, तसा मी लढेन! मोठें राज्य मिळवीन आणि मोठा राजा होईन!" असें आईला तो म्हणे.

दादोजी कोंडदेवानें शिवाजीला घोड्यावर बसायला शिकविलें. दांडपट्टा कसा फिरवावा, भाला कसा फेकावा, तलवार कशी फिरवावी, या साऱ्या गोष्टी त्याला येऊं लागल्या. शिवाजीचा शूरपणा पाहून देवी भवानीनें त्याला एक मोठी तलवार बक्षीस दिली !



तानाजी, एसाजी आणि पासलकर बाजी.
शिवाजीचे सरदार ; लई लई हुश्यार.
शिवाजीला प्यार ; लढाईला तय्यार !

शिवाजीनें लढायांचा सपाटा सुरू केला. विजापूरच्या बादशाहाचेही कांहीं किल्ले घेतले. बादशाहाला राग आला. त्यानें शहाजीला कैदेंत ठेविलें. पण शिवाजीनें काय गंमत केली, दिल्लीच्या बादशाहाची मदत घेतली. विजापूरचा बादशाहा घाबरला आणि शहाजीला सोडून दिलें.

एके दिवशीं काय झालें, विजापूरच्या बादशाहाचा अफझुल-खान सरदार होता. मस्त फार. शिवाजीला पकडण्याचा विडा उचलला आणि मोठें सैन्य घेऊन निघाला. शिवाजीच्या राज्यांत आला. खानाचा सारा बेत शिवाजीला समजला.



शिवाजीनें एकट्यालाच बोलाविलें भेटायला. युक्तीनें ठार केलें अफझुलखानाला!

एकदां दिल्लीच्या बादशाहानें शिवाजीला भेटायला बोलाविलें आणि पकडून ठेविलें. पण शिवाजी घाबरला नाहीं. एके दिवशीं शिवाजीनें बादशाहाला सांगितलें, " तुम्हीं मला पकडलें, पण माझें सैन्य कशाला पकडून ठेविलें आहे? खायला काळ आणि भुईला भार. द्या त्याला सोडून!" बादशाहाला पटलें. सारें सैन्य सोडून दिलें. शिवाजी आणि मुलगा संभाजी हे मात्र अडकले.

बादशाहानें त्यांच्या खोलीभोवतीं कडक पहारा ठेविला. पण एक दिवस असा आला. शिवाजी आणि संभाजी पेटाऱ्यांत बसले आणि पळून गेले. शोध शोध शोधलें. पण सांपडलेच नाहींत.



शिवाईचा शिवाजी
जिजाईचा शिवाजी
शहाजीचा शिवाजी

भारी हुश्यार, भारी हुश्यार, लढाया केल्या फार फार, शत्रूला दाखविलें स्वर्गाचें दार, झाला गरिबांना आधार.

मराठ्यांचा राजा झाला.
रायगडला राजवाडा बांधला.
सगळ्यांना आनंद झाला.

## प्रश्न

१ शिवाजी कैदेंतून कसा पळाला ?
२ शिवाजीचे सरदार कोण होते ?
३ शिवाजीला कोणीं शिकविलें ?
४ शिवाजीला पकडण्यासाठीं कोण आला होता ?
५ (क) शहाजीनें जिजाबाईला ———— किल्ल्यांत ठेविलें.
(ख) देवी भवानीनें शिवाजीला ———— बक्षीस दिली.
(ट) दिल्लीच्या बादशाहानें ———— भेटीस बोलाविलें.
(त) शिवाजी आणि संभाजी ———— बसून पळून गेले.

वरील वाक्यांत गाळलेले शब्द भरा.

★ १२ ★

# राणी लक्ष्मीबाई

पेशव्यांकडे मोरोपंत तांबे नोकरी करीत होते. त्यांची मुलगी मनूताई. रूपानें आणि गुणानें फार चांगली होती.

मनूताई आठ वर्षांची झाली. झांशीच्या गंगाधररावांची राणी झाली. झांशीचें राज्य इंग्रजांच्या ताब्यांत होतें. लग्न होतांच गंगाधररावांना इंग्रजांनीं झांशीचें राज्य दिलें. मनूताई घरांत आली म्हणून आपलें राज्य मिळालें, असें वाटून सारे लोक तिला 'लक्ष्मीबाई' म्हणूं लागले.

कांहीं दिवसांनीं लक्ष्मीबाईला मुलगा झाला. पण तो तीन महिन्यांतच मरण पावला. लवकरच गंगाधरराव आजारी पडले. आतां आपणही मरणार असें वाटून त्यांनीं एक मुलगा दत्तक घेतला. त्याचें नांव दामोदर ठेवलें. थोड्याच दिवसांनीं गंगाधरराव मरण पावले. इंग्रज म्हणाले, "दामोदराला आम्ही राज्य देणार नाहीं." म्हणून राज्य परत घेतलें व राणीला दरमहा पांच हजार रुपये पेन्शन दिलें. राणीला फार वाईट वाटलें. पण करणार काय?

लक्ष्मीबाई सगळ्या लोकांना आवडत असे. ती कधीं पुरुषवेषांत देखील दरबारांत जाई.

एकदा हिंदुस्थानांतल्या साऱ्या संस्थानांच्या राजांनीं 'स्वातंत्र्ययुद्ध' सुरू केलें. जिकडे तिकडे लुटालूट सुरू झाली. इंग्रजांचे अधिकारी संस्थान सोडून पळाले. तेव्हां राणी पुन्हां

राज्य करूं लागली. किल्ल्याचा बंदोबस्त केला. लुटालूट बंद केली.


इंग्रजांचें सैन्य शत्रूला मारीत मारीत झांशीला आलें. राणीनें बंड केलें नव्हतें. तरी देखील इंग्रजांच्या सेनापतीनें झांशीवर हल्ला केला. राणीला राग आला. मग तीही संस्थानिकांना मिळाली. सेनापतीनें किल्ल्याला वेढा दिला. बरेच दिवस झाले. शेवटीं राणीचा नाइलाज झाला. किल्ल्यांतून पळून जाण्याचा तिनें विचार केला.

एके दिवशीं लक्ष्मीबाई आपल्या मुलाला बरोबर घेऊन किल्ल्यांतून पळाली. मोरोपंत तांबे बरोबर होते. पण इतक्यांत



मागून इंग्रजांचा सेनापति आला. मोरोपंत सांपडले सेनापतीला. सेनापतीनें मोरोपंतांना फाशीं दिलें.

राणी लक्ष्मीबाई घोड्यावर बसली. हातांत तलवार घेतली आणि शौर्यानें लढूं लागली. सभोंवतीं सैन्यानें गराडा घातला, पण राणी घाबरली नाहीं कोणाला. तलवार फिरविली चराचरा. रक्ताचा पाट वाहूं लागला. प्रेतांचा ढीग पडला. सेनापति घाबरला. पण तिकडून बरेंच सैन्य आलें सेनापतीच्या मदतीला. राणीनें घोड्याचा लगाम खेंचला आणि अशी टांच दिली त्याला कीं घोडा चौखूर उडाला. घोडा एका नदीपाशीं आला. पाणी पाहतांच दचकला! मोठा घात झाला! मागून सेनापति धावत आला. बंदूक मारली राणीच्या घोड्याला. घोडा तडफडत खालीं पडला. इतक्यांत मागून कोणीतरी आला. राणीला तरवारीचा वार केला!



राणी घायाळ झाली. तरी देखील तिनें तरवार अशी चालविली कीं मुडद्यांची रास पडली. पण शेवटीं लढतां लढतां

दमली आणि खालीं पडली. सेनापतीला तिची दया नाहीं आली. तिच्या पोटांत तलवार भोसकली. राणी मरून पडली ! अरेरे ! घात झाला !

### प्रश्न

१ राणीला ' लक्ष्मीबाई ' असें नांव कां पडलें ?

२ राजेलोकांनीं बंड कां केलें ?

३ राणीला कोणीं मारलें ?

४ वाक्यें जुळवा —

(य) दरमहा, राणीला, दिलें; रुपये, पांच हजार, पेन्शन.

(र) वाहूं, रक्ताचे, पाट, लागले.

(ल) बंदोबस्त, चांगला, किल्ल्याचा, केला.

---

☆ १३ ☆

## हैदरअल्ली

म्हैसूर येथें एक हिंदू राजा होता. त्याचें नांव कृष्णराजा. कृष्णराजाचा दिवाण होता नंदराज. राज्याची सारी व्यवस्था नंदराज पाहत असे.




एकदा नंदराज लढाईला गेला. किल्याला वेढा दिला. पण किल्ला कांहीं हातीं येईना. त्याच्या सैन्यांत एक मुसलमान शिपाई होता. त्याचें नांव हैदरअल्ली. तो पुढें आला. शौर्यानें लढला आणि किल्ला मिळविला. नंदराज खूष झाला. हैदराला ' नाईक '

केला. लवकरच तो फौजदार झाला.

एकदा मराठ्यांनीं म्हैसूरवर स्वारी केली. पण हैदरअली शौर्यानें लढला. सारे मराठे परत गेले. नंदराजानें हैदराला दरबारांत बोलाविलें आणि 'फत्ते हैदर' अशी पदवी देऊन मोठें बक्षीस दिलें.

हैदरअलीला वाटूं लागलें, 'आपण म्हैसूरचा दिवाण व्हावें.' एकदा काय झालें, खजिन्यांत पैशांची तूट पडली. सैन्यांतले शिपाई पगारासाठीं नंदराजाकडे धरणें धरून बसले. नंदराज घाबरला. 'एवढ्या लोकांचा पगार द्यायचा कसा ?'



हैदरअलीजवळ पुष्कळ पैसा होता. हैदरअली राजाला म्हणाला, 'मी ह्यांचा पगार देतों.' साऱ्या शिपायांना पगार दिला.

राजा खूप झाला. हाकून दिलें नंदराजाला आणि दिवाण केला हैदराला.

हैदरअली दिवाण झाला. पण एके दिवशीं हाकून दिलें राजाला आणि आपण झाला म्हैसूरचा राजा.

हैदरानें खूप लढाया केल्या. खूप राज्य मिळविलें. खूपखूप पैसा मिळविला. एकदा बिदनूर नांवाच्या किल्ल्याची दुरुस्ती करतांना हैदराला बारा कोटि रुपये मिळाले.

हैदराचा एक दिवाण होता. त्याचें नांव पूर्णय्या. कनोजी ब्राह्मण होता तो. हैदराला लिहितां येत नव्हतें, वाचतां येत नव्हतें. तोंडी हिशेब मात्र तो पटापट करी !

हैदरअल्लीची शिस्त फार कडक होती. जो कोणी हुकूम मोडील त्याला तो कडक शिक्षा करी. त्यामुळें सारे लोक त्याला भीत. हैदराला एक मुलगा होता. तो तर हैदरापेक्षां शूर होता. त्याचें नांव टिपू. सारे लोक त्याला 'म्हैसूरचा वाघ' म्हणत असत !

सैन्यांतला शिपाई
नाईक, फौजदार झाला.
शौर्यानें लढला, जय मिळविला.

नंदराज दिवाणाला हाकून, झाला आपण दिवाण.

म्हैसूरचा कृष्णराजा.
त्याचा केला गाजावाजा.
हैदरअली झाला म्हैसूरचा राजा.

## प्रश्न

१ खालील वाक्यें बरोबर करा.

(क) हैदरअल्ली भित्रा होता.

(ख) नंदराजाला ' म्हैसूरचा वाघ ' म्हणत असत.

(ग) रायगड किल्ल्यांत हैदराला बारा कोटि रुपये मिळाले.

२ खालील नांवें मोठ्यापासून छोट्यापर्यंत क्रमानें लिहा.

नाईक, शिपाई, राजा, फौजदार, दिवाण.

३ टिपू हा कोण होता ?

४ ' फत्ते हैदर ' ही पदवी कोणाला मिळाली ?

५ नंदराजाला राजानें हाकून कां दिलें ?

---

★ १४ ★

# नाना फडणीस

पेशव्यांकडे होता एक नाना. सगळे लोक म्हणत त्याला ' अर्धा शाहाणा. ' त्याचें खरें आडनांव भानू होतें. पेशव्यांकडे जमाखर्च लिहिण्याचें काम नाना करीत. म्हणून त्यांना ' नाना फडणीस ' म्हणत.



सवाई माधवराव पेशवे झाले. पण ते लहान होते. त्यांचें सारें काम नानाच करीत. नानांनीं बावीस वर्षें काम केलें. पण कधीं लढाई

केली नाहीं. युक्त्या मात्र ते पुष्कळ सांगत. कोणाला कांहीं अडचण आली कीं नानांना विचारीत. नाना डोकें खाजवून युक्ति सांगत.

एकदां सवाई माधवराव लहान असतांना त्यांना ठार मारण्याचा कांहीं लोकांनीं बेत केला. पण नानांनीं मोठ्या युक्तीनें त्यांचा जीव वाचविला.

एकदां एक माणूस नानांकडे आला व म्हणाला, 'मला सात भाषा येतात!' कोणालाही त्याची खरी भाषा ओळखतां येईना. नाना म्हणाले, 'आजचा दिवस तुम्ही आमच्याकडे रहा.' रात्र झाली. पाहुणा झोपला. गाढ झोप लागली. नानांनीं हळूच त्याच्या तोंडावर थंड पाणी ओतलें.



थंड पाणी पडतांच तो, 'सूं छे, सूं छे!' असें ओरडला. दुसऱ्या दिवशीं नाना म्हणाले, 'तुमची भाषा गुजराती.'

एकदां नानांच्या शत्रूंनीं बेत केला. 'नानांना पकडून ठार मारायचें! एकानें नानांजवळ गप्पा मारीत बसावें आणि

२९५७५



सा ग्रं ६७६

इतरांनीं येऊन पटकन् पकडावें.' पण नाना कसले वस्ताद! हा बेत नानांना समजला. मागच्या दारीं नानांनीं पालखी तयार ठेविली. ठरल्याप्रमाणें गप्पीदास आला आणि गप्पा मारूं लागला. 'थोड्या वेळांत येतों' असें सांगून नाना गेले. ते पालखींत बसून पसार झाले. बराच वेळ झाला. नाना



अजून कां येत नाहींत? पाहातात तों नाना आहेत कुठें? केव्हांच पसार झाले होते.

एकदां एक सौदागर नानांकडे आला. त्याच्याजवळ दोन घोड्या होत्या. दोघीही अगदीं एकसारख्या एक दिसत पण त्यांतली एक होती आई आणि एक होती लेक. सौदागर म्हणाला, 'यांतली आई कोणती व लेक कोणती ?' नानांस विचार पडला. नाना म्हणाले, 'घोड्या घेऊन माझ्याबरोबर चला.' वाटेंत एक ओढा लागला. नाना पुढें गेले. सौदागर घोड्या घेऊन ओढ्यांतून येऊं लागला. तों एक घोडी पुढें आणि एक